# व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण कायदा करणार - टोपे

## हिवाळी अधिवेशनात मंजूर करण्याचा प्रयत्न



पुणे, दि. १ (प्रतिनिधी)- राज्यातील व्यावसायिक शिक्षण अधिक दर्जेदार व्हावे, तसेच कुशल मनुष्यबळाच्या निर्मितीतून रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात यासाठी व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण कायदा करण्यात येणार असून येत्या पावसाळी अधिवेशनात त्याची ओळख करून देण्याचा व हिवाळी अधिवेशनात तो मंजूर करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री राजेश टोपे यांनी सांगितली.

पुण्यातील सिंबायोसिस सेंटर फॉर डिस्टन्स लर्निंग सेंटरच्या संचालिका व व्यावसायिक शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या बाबींचा अभ्यास करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या अध्यक्षा स्वाती मुजुमदार यांनी व्यावसायिक शिक्षणामधील बदलांबाबतचा अहवाल टोपे यांच्याकडे सुपूर्द केला, त्यावेळी टोपे बोलत होते.

टोपे म्हणाले की, व्यावसायिक अभ्यासक्रमाचा समावेश नववी ते दहावीपासून करण्यात येणार आहे. दहावीच्या व बारावीच्या वर्गात एक असताना एक व्यावसायिक अभ्यासक्रमाचा विषय घेण्याची सोय राहणार आहे. सद्यस्थितीत व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी व वैद्यकीय अभ्यासक्रमास बसण्याची परवानगी नाही, तसेच डी. एड्.व तत्सम अभ्यासक्रमासही प्रवेश घेता येत नाही. त्यामुळे हा कायदा संमत झाल्यानंतर व्यावसायिक अभ्यासक्रम घेणाऱ्या विद्यार्थ्यांना एसएससी व एचएचसी समकक्ष प्रमाणपत्र मिळणार आहे.

पुढील काळात व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र विद्यापीठही स्थापन करण्यात येणार आहे; मात्र त्यापूर्वी मंत्रिमंडळाची परवानगी घेणार आहे, असेही टोपे म्हणाले.